<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६६/२०११ मधील नि.क्र. ६० वरील आदेश</u>

[CNR No.MHRG140005932011]

१. प्रतिवादी क्र. ३,५,७ व ९ यांनी सदरचा अर्ज प्रमोद नामदेव पाटील यांना प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात यावे याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १ नियम १०(२) अन्वये दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर वादी तर्फे नि.क्र. ६१ वर म्हणणे देवून हरकत घेतलेली आहे. सदर वादीने पुढे कथन केले आहे की, सदरचा अर्ज कायद्याच्या कोणत्या तरतुदीखाली दाखल केलेला आहे हे अर्जात नमुद नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. श्री. प्रमोद पाटील यांचे नाव हे ७/१२ दप्तरी असले तरी सदर दावा दाखल करण्याच्या आगोदरच व्यवहार केलेला होता. सबब प्रमोद पाटील यांना यांचे नाव आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील मिळकत ७/१२ उतारा-यावर प्रमोद नामदेव पाटील यांची ००.०२.०० गुंठे क्षेत्रात मालकी असल्याचे दिसून येत आहे. दाव्यातील नमुद मिळकतीत प्रमोद पाटील यांचा हिस्सा असल्याने त्यांच्या गैरहजेरीत परिणामकारक हुकूमनामा अथवा कोणताही आदेश करणे होणेकमी त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून दाव्यात सामील करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

७.		प्रतिवादींचा अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरचा दावा गुणदोषावर निकाल करणेसाठी सदर नियोजित प्रमोद नामदेव पाटील यांना सदर दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे न्यायोचित आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नसून उलट दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादींनी प्रमोद नामदेव पाटील यांना याकामी पक्षकार म्हणून सामील करावे.
३. वादी यांनी दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत न्यायालयासाठी व प्रतिवादीसाठी दयावी.

ठिकाण – उरण.		(निलेश एम. वाली )

दिनांक:  ०५.०९.२०२३		सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.